**कृपया प्रसिध्दिसाठी** **24 जून 2009**

# डिझेलचा परतावा सुरु न केल्यास मच्छिमार आंदोलन करणार : राम नाईक

**मुंबई, बुधवार :**देशभरातील मच्छिमारांच्यात श्री. शरद पवार त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत आहेत अशी भावना असून आगामी अर्थसंकल्पात डिझेलचा बंद केलेला परतावा सुरु करुन योग्य त्या अन्य तरतूदी न केल्यास मच्छिमारांना आंदोलन करावे लागेल असा इशारा भाजपा नेते श्री. राम नाईक यांनी दिला आहे. नवी दिल्लीला मच्छिमारांच्या वतीने श्री. पवार यांना निवेदन देण्यास श्री. राम नाईक व अन्य भाजपा नेते गेले होते. श्री. पवार परदेशी गेले असल्यामुळे निवेदनासंबंधी चर्चा कृषि खात्याचे सहसचिव श्री. तरुण श्रीधर यांच्याशी झाली. त्यावेळी भाजपा, मुंबईचे अध्यक्ष व आमदार श्री. गोपाळ शेट्टी आणि उपाध्यक्ष श्री. रमेश मेढेकरही उपस्थित होते.

यासंदर्भात अधिक माहिती देताना केंद्रिय कृषि मंत्री श्री. शरद पवार यांनी मच्छिमारांना वाजपेयी सरकारने डिझेलवर दिलेल्या प्रति लीटर रु. 1.50 च्या अनुदानापासून वंचित केले आहे, असा आरोप माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी केला. श्री. नाईक म्हणाले,"छोट्या मच्छिमारांना प्रोत्साहन म्हणून बोटींसाठी लागणा-या डिझेलवरील अबकारी करातून प्रति लीटर 30 पैसे कर परतावा मिळत असे. आंतरराष्ट्रीय बाजारात वाढलेले डिझेलचे भाव लक्षात घेऊन वाजपेयी सरकारने हे अनुदान प्रति लीटर रु. 1.50 पर्यंत वाढविले होते. त्यानंतर सत्तेवर आलेल्या काँग्रेस सरकारच्या राज्यात तर पेट्रोलियम पदार्थांचे भाव आणखीच कडाडले. तशात मच्छिमारांना मत्स्य दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे हे अनुदान प्रति लीटर रु. 4 पर्यंत वाढवावे, अशी मागणी गेली दोन वर्षे मच्छिमार करीत आहेत. केंद्र सरकारने हे अनुदान दिनांक 19 फेब्रुवारी 2009 च्या परिपत्रकाद्वारे रु. 3 पर्यंत वाढविले परंतु ते दारिद्र्य रेषेखालील मच्छिमारांनाच मिळेल अशी अट घातली आहे. महाराष्ट्रात ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेची मर्यादा कमाल मासिक उत्पन्न रु. 362.25, तर शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील उत्पन्नाची कमाल मर्यादा मासिक रु. 665.90 अशी आहे. श्री. शरद पवार यांनी दारिद्र्य रेषेखालील परंतु डिझेलवर चालणारी बोट असलेला एक तरी मच्छिमार दाखवावा, असे आव्हान देऊन श्री. नाईक म्हणाले, "सवलतीच्या स्वरुपात असा बदल करुन खरं तर ती सवलतच श्री. पवार यांनी रद्द केली आहे अशी मच्छिमारांची भावना आहे."

श्री. पवार यांनी पुन्हा सर्व मच्छिमारांना ही सवलत द्यावी आणि तीही रु. 4 पर्यंत वाढवावी, अशी मागणीही श्री. नाईक यांनी श्री. पवार यांच्याकडे केली आहे.

मासेमारी ही मत्स्य शेतीच मानली जाते म्हणूनच ती कृषि खात्यांतर्गत येते. त्यामुळेच शेतक-यांप्रमाणेच मच्छिमारांनाही राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून (एनसीडीसी) चार टक्के व्याज दराने कर्ज मिळावे अशीही मागणी मच्छिमारांच्या शिष्टमंडळाने श्री.राम नाईक यांच्यामार्फत केली होती. श्री. पवार यांनी या मागणीला प्रत्यक्ष चर्चेत सकारात्मक प्रतिसाद दिला होता. परंतु प्रत्यक्षात मच्छिमारांनी त्यांच्या सहकारी संस्थाकडून कर्ज घ्यावे. या संस्थांना एनसीडीसी व्यापारी दराने कर्ज देते असे श्री. शरद पवार यांनी श्री. नाईक यांना कळवून मच्छिमारांच्या या मागणीलाही झिडकारले होते. मच्छिमारांच्या या मागणीवर केंद्र सरकारने पुनर्विचार करावा अशी विनंती श्री. नाईक यांनी श्री. पवार यांना केली आहे.

समुद्राच्या पूर्णतः आर्थिक विभागात (एक्सक्यूझिव इकॉनॉमिक झोन - ईईझेड) कायदा व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी सध्या कोणताही कायदा अस्तित्वात नाही. यावर तोडगा म्हणून समुद्रातील कायदा व सुव्यवस्थेसाठी नवा कायदा करण्यात यावा, अशीही मच्छिमारांची मागणी होती. या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर या संबंधात कायदा बनविण्यासाठी विविध मंत्रालयांचा एकत्र विचार सुरु असल्याचे श्री. पवार यांनी कळविले होते. आता निदान आगामी लोकसभा अधिवेशनात या संबंधीचा कायदा मान्य करुन घ्यावा, अशी मागणीही श्री. नाईक यांनी केली आहे.

देशभरात वेगवेगळया राज्यांत मच्छिमारी बंदरांचा जाणीवपूर्वक विकास केला जात आहे. महाराष्ट्रातही ठाणे जिल्हयातील अर्नाळयासह मिरकरवाडा (रत्नागिरी), देवगड (आनंदवाडी), साख्रिनाते, हर्णे, करंजा, जीवना, आगरदांडा या आठ बंदरांचा विकास करण्याची योजना गेली अनेक वर्षे फक्त चर्चेत आहे. त्याबद्दल निर्णय घेऊन तो राबविण्यासाठी केंद्र सरकारच्या हस्तक्षेपाची मागणी मच्छिमार करीत होते. परंतु प्रत्यक्षात आठपैकी देवगड (आनंदवाडी) या एकाच बंदराच्या विकासाला श्री. पवार यांनी हिरवा कंदिल दाखविला होता, अन्य बंदरांचा तांत्रिक अभ्यास पूर्ण झालेला नाही असे सांगण्यात आले होते. निदान आता तरी हे काम अग्रक्रमाने करावे, अशी महाराष्ट्रातील मच्छिमारांची अपेक्षा असल्याचे श्री. नाईक यांनी सांगितले.

**(कार्यालय सचिव)**